# :: प्रेस नोट ::

दि. ११/०४/२०२२

आरोपी लोकसेवक - श्रीमती.मिरा विलास नागरगोजे,वय ३९ वर्ष,कनिष्ठ सहायक,पंचायत समिती कार्यालय,पाटोदा,ता.पाटोदा.जि.बीड रा.इंद्रप्रस्त कॉलनी,नगर रोड,बीड यांनी १०००/- ( एक हजार रुपये) लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ५००/- ( पाचशे रुपये) लाच स्विकारल्या वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांचेकडुन कारवाई .

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड |
| पोलीस स्टेशन | पाटोदा |
| गुन्हा नोंद कलम | कलम ७भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्रीमती.मिरा विलास नागरगोजे,वय ३९ वर्ष,कनिष्ठ सहायक,पंचायत समिती कार्यालय,पाटोदा,ता.पाटोदा.जि.बीड रा. इंद्रप्रस्त कॉलनी,नगर रोड,बीड |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५००/- ( पाचशे रूपये) |
| थोडक्यात माहिती | दिनांक.११/०४/२०२२ रोजी तकारदार यांनी तकार दिली की, तकारदार यांचे वडीलांच्या नावे आहिल्यादेवी होळकर जलसिंचन योजने अंतर्गत मंजुर विहिरीचे सांकेतिक क्रमांक काढण्याकरीता पत्र देण्यासाठी लोकसेक श्रीमती नागरगोजे या १०००/- रुपये ( एक हजार रुपये) लाचेची मागणी करत आहेत. तकारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे तकार दिली.<br>सदर तकारीच्या अनुषंगाने दिनांक.११/०४/२०२२रोजी पंचा समक्ष लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक श्रीमती मिरा नागरगोजे यांनी १०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ५००/- रुपये (पाचशे रुपये) स्विकारण्याचे मान्य केले.<br>सदर लाच मागणीवरुन आज दिनांक.११/०४/२०२२ रोजी सापळा लावला असतां आलोसे श्रीमती.नागरगोजे यांना तकारदार यांचे कडूनपंचासमक्ष ५००/- रुपये ( पाचशे रुपये) लाच रक्कम स्विकारतांना पंचायत समिती कार्यालय,पाटोदा येथे रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>आलोसे श्रीमती.मिरा विलास नागरगोजे,वय ३९ वर्ष,कनिष्ठ सहायक,पंचायत समिती कार्यालय,पाटोदा,ता.पाटोदा.जि.बीड रा. इंद्रप्रस्त कॉलनी,नगर रोड,बीड यांचे विरुध्द पोलीस ठाणे पाटोदा येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.डॉ.राहुल खाडे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, श्री.विशाल खांबे,अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, पोलीस उप-अधीक्षक श्री.शंकर शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक,अमोल धस,पोलीस अंमलदार हनुमान गोरे,भरत गारदे,श्रीराम गिराम,चालक अंमलदार गणेश म्हेत्रे ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड

संकेतस्थळ :- **acbwebmail@mahapolice.gov.in**

ई-मेल :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in**

2) **dyspacbbeed@gmail.com**

ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**

टोल फ्रि क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४४२-२२२६४९

व्हॉटस अप क. :- ९९३०९९७७००

पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद :- ८८८८८०७२९९

अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद :- ९८८११००८१२३

पोलीस उप अधीक्षक,लाप्रवि,बीड :- ९३५५१००१००

( अमोल धस )

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.